श्रीनारदीय

भक्त्यधिकरण-न्यायमाला

(श्रीगुलाबरावमहाराज विरचित भक्तिसूत्रांवरील अधिकरणन्यायमाला पूर्ण ८४ सूत्रांवर आहे; परंतु महाराजांचे त्यावरील स्वकृत संस्कृतभाष्य हे मात्र 'फलरूपत्वात्' या २६ व्या सूत्रापर्यंतच उपलब्ध आहे.(आवृत्ति ३री २०१०/यष्टी १६- ग्रंथ २६ वा / पान २०४ ते २८३)- संपादक.)

....

॥ श्रीज्ञानेश्वरं नुमः ॥

यत्सत्तया जगत्सत्यं यत्प्रतीतेः प्रतीयते ।
यदानन्देन सानन्दं तं श्रीज्ञानेश्वरं नुमः ॥

भक्तिसूत्राणि

अथातो भक्तिं व्याख्यास्यामः ॥१॥

अर्थः- आता आम्ही भक्तीचे व्याख्यान करतो.

''श्रीनारदीयभक्त्यधिकरणन्यायमाला''

भक्त्यावश्यकत्वाधिकरणम्

भक्तिर्ग्राह्या न वात्र प्रवदति न हि सज्ज्ञानकर्मादिसिद्धेः ।
ग्राह्या यस्मात्प्रसादः शिवपदरजसां तां विना जायते नो ।
सौकर्याद्विघ्नहंत्री प्रपतति न यतः कोऽपि वर्णो महात्मा ।
ब्रह्मज्ञानोपलब्धावपि हरिपरमानन्दतायै श्रयेत ॥१॥

अर्थ :- शंका - भक्ती करावी की नाही ?

पूर्वपक्ष - कोणी म्हणतात सद्ब्रह्माचे ज्ञान व कर्म इत्यादिकांचे द्वारा ब्रह्मैक्यता होत असल्यामुळे भक्तीची आवश्यकता नाही.

सिद्धान्त :- भगवन्ताच्या चरणरजाच्या प्रसादावाचून चित्ताची शुद्धी, एकाग्रता इत्यादि सामग्री साध्य होत नसल्यामुळे सगुण भगवन्ताच्या भक्तीची आवश्यकता आहे. शिवाय कर्मादि साधनांपेक्षा ती सुलभ आहे व सर्व विघ्ने दूर करणारी आहे म्हणून ती ग्राह्य आहे.भक्ती करणरा

कोणत्याहि जातीचा असला तरी तो तो महात्मा पतन पावू शकत नाही, असा भक्तीचा महिमा आहे. म्हणून ब्रह्मज्ञान झाल्यानंतरही परमानंदप्राप्तिकरिता ज्ञान्यांनीहि भक्तीचा आश्रय केला पाहिजे.

सा त्वस्मिन्परमप्रेमरूपा ॥२॥

अर्थ :- हृदयस्थ सगुण परमेश्वाचे ठिकाणी जे स्वाभविक परमप्रेम ती भक्ति होय ॥२॥

॥ भक्तिलक्षणाधिकरणम् ॥

अधिकरणन्यायमाला

सापेक्षा वाऽनपेक्षा भवति परपदेच्छैव सापेक्षरूपा ।
मोक्षःकृष्णो निजात्माऽपिहि न विरहितः प्रीतिरूपाच्च यस्मात् ।
आत्मप्रीतिर्विगर्वा भगवति लभते पूर्णसद्भक्तिसंज्ञाम् ।
तस्मादस्मिन्परेशे द्रुतपरमतमप्रेमतः साऽनपेक्षा ॥२॥

शंका :- भक्तीला कशाची (कोणत्या साधनाची) अपेक्षा आहे किंवा नाही?

पूर्वपक्ष :- भक्ती परमपद अशा परमेश्वराच्या प्राप्तीची इच्छाच असल्यामुळे तिला दुसऱ्या कोणत्या तरी साधनाची अपेक्षा आहे.

सिद्धांत :- भगवान् श्रीकृष्ण हा आपले आत्मस्वरूपच असल्यामुळे मोक्षरूपच आहे. तो आत्मप्रीतीमुळे कधी निराळा राहत नाही. ही आत्मप्रीतीच सगुण भगवंताचे ठिकाणी अहंकाररहित होऊ लागली असता ती 'भक्ती' या नांवाला प्राप्त होते. सगुण परमेश्वारचे ठिकाणी परमप्रेमाने अत्यंत द्रवीभूत झालेले चित्त 'भक्ती' या संज्ञेला प्राप्त होत असल्यामुळे तिला (भक्तीला) कशाची अपेक्षा लागत नाही.

अमृतस्वरूपा च ॥३॥

अर्थ :- भक्ती ही अविनाशीस्वरूप आहे. ॥३॥

भक्तिवस्तुतंत्रत्वाधिकरणम् ।

यल्लब्ध्वा पुमान् सिद्धो भवत्यमृतो भवति तृप्तो भवति ॥४॥

अर्थ :- जी भक्ती प्राप्त झाली असतां पुरुष अविद्यादि दोषरहित होतो, अविनाशी होतो व निर्वासन म्हण्जे समूळ वासनारहित होतो.॥४॥

अधिकरण माला

स्वतो वा परतः शक्ता भक्तिः परत एव च ।
जन्मान्तरीयसंस्कारवैराग्यादेरपेक्षणात् ॥
ज्ञानवैराग्यनामानौ भगवद्भक्तिनन्दनौ ।
प्रेम्णश्च वस्तुतंत्रत्वात्समर्था स्वत एव सा ॥

शंका :- सगुण भगवंताच्या चरणांच्या ठिकाणी जी प्रेमरूप भक्ती होते ती स्वतः प्रगट होते किंवा कोणत्या साधनाच्त्रया साह्याने प्रगट होते?

पूर्वपक्ष :- मागील जन्मातील संस्कार वैराग्य इत्यादिकांच्या योगाने भक्ति उत्पन्न होते, असे सांगितले असल्यामुळे दुसऱ्या साधनांच्या साह्याने भक्ति उत्पन्न होते.

सिद्धांत :- ज्ञान व वैराग्य ही भक्तीचीच लेकरे आहेत, असे भागवतात आहे. प्रेम हे वस्तुतंत्र असल्यामुळे भक्ती ही सर्व साधनांहून निरपेक्ष अशी स्वतंत्र आहे.॥४॥

यत्प्राप्य न किञ्चिद्वाञ्छति न शोचति

न द्वेष्टि न रमते नोत्साही भवति ॥५॥

अर्थ :- भक्ती प्राप्त झाली असता भक्ताला कशाचीहि इच्छा रहात नाही. त्याला शोक होत नाही. तो कशाचाहि द्वेष करीत नाही. त्याचे विषयात मन रमत नाही व कोणत्याहि विषयात त्याला उत्साह वाटत नाही.॥५॥

यज्ज्ञात्वा मत्तो भवति स्तब्धो भवति आत्मारामो भवति ॥६॥

अर्थ :- अजिंक्य असा भगवान् मी जिंकला अशा बुद्धीने मत्त होतो. भगवत्प्रेमाने चित्तवृत्ती समाधिस्थ झाल्यामुळे तो स्तब्ध होतो व तो परमेश्वराला आपल्याहून निराळा पहात नाही.॥६॥

भक्तेः राजसाभाववत्वाधिकरणम्

सा न कामयमाना निरोधरूपत्वात् ॥७॥

अर्थ :- भक्ति ही निरोधरूप असल्यामुळे वासना वाढविणारी नाही. ॥७॥

भक्ति ही राजस नाही.

अधिकरणन्यायमाला

रागात्मिकाऽसावयवा न चास्ते । रागात्मिका भोग्यसमत्वहेतोः ।
रागो नराणां विषये स्वतोऽर्थे । तद्वन्न, भक्तिं व्रज, पार्थकत्वात् ॥

शंका :- भक्ति ही रागरूप आहे किंवा नाही?

पूर्वपक्ष :- प्रीति व राग एकच आहेत म्हणून भक्ति रागरूपच आहे.

सिद्धांत :- असे नाही. राग व प्रीति यात फरक आहे. ''रजो रागात्मकं विद्धि'' असे म्हणून गीतेत रागाला रजोगुणी ठरविले आहे व सांख्याने प्रीतीला सत्त्वगुणी ठरविले आहे. राग हा मनुष्याच्या स्वतःच्या सुखाकरिता असतो. याहून प्रीति निराळी आहे. म्हणून प्रेमभक्तीला शरण जा.

निरोधस्तु लोकवेदव्यापारन्यासः ॥८॥

अर्थ :- निरोध म्हणजे संसारसुख देणाऱ्या सर्व लौकिक विशेषांचा व निवृत्तिपर वैदिक क्रियांचा त्याग करणे होय. ॥८॥

तस्मिन्ननन्यता तद्विरोधिषूदासीनता च ॥९॥

अर्थ :- एका भगवंताचाच आश्रय करून भगवन्विन्मुखांन्विषयी उदासीन राहावे. ॥९॥

अनन्यत्वाधिकरणम् ।

अन्याश्रयाणां त्यागोऽनन्यता ॥१०॥

अर्थ :- एका भगवंतावांचून दुसऱ्या देवतांचा आश्रय न करणे याला अनन्यता म्हणतात॥१०॥

अधिकरणन्यायमाला

आश्रयस्यान्यदेवानां त्यागः कार्योऽथवा नहि ।
ते मुक्तौ विघ्नकर्तारस्तस्मात्त्यागो न चोचितः॥६॥
ईशितुः सर्वसामार्थ्यात्कारणब्रह्मरूपतः ।
आत्मप्रीतेरभिन्नत्वात्त्यजेदन्याश्रयं बुधः ॥७॥

शंका :- भगवंताच्या भक्तीकरिता भगवंतावाचून दुसऱ्या कोण्याहि देवतांचा आश्रय सोडावा किंवा नाही?

पूर्वपक्ष :- देवतांचा आश्रय सोडला तर त्या मुक्तिमध्ये विघ्न करतात. म्हणून त्यांचा आश्रय सोडता कामा नये.

सिद्धांत :- परमात्मा सर्वसमर्थ असल्यामुळे देवतादिक त्याच्या आज्ञेत वागतात व तो कारणब्रह्मस्वरूप असून आत्मप्रीतिरूपच असल्यामुळे शहाण्यांनी त्याच्यावांचून इतर सर्व देवतांच्या आश्रयाचा त्याग करावा.

लोकवेदेषु तदनुकूलाचरणं तद्विरोधिषूदासीनता ॥११॥

अर्थ :- भगवत्प्राप्तीला साधक असेल असे लौकिक-वैदिक आचरण करावे. व जे आचरण भगवत्प्राप्तीला बाधक असेल त्या ठिकाणी उदासीन असावे.॥११॥

भवतु निश्चयदार्ढ्यादूर्ध्वं शास्त्ररक्षणम् ॥१२॥

अर्थ :- चित्ताला सगुण भगवंताची प्रेमभक्ति लागल्यावरही दृढनिश्चयाने भगवदाज्ञारूप शास्त्रानुसार वागून त्याचे रक्षण होवो.॥१२॥

अन्यथा पातित्याशंकया ॥१३॥

अर्थ :- नाहीतर आपण (भक्तीपासून) पतित होवू अशी भक्ताला शंका येत असते.

भोजनादिव्यापाराधिकरणम्

लोकेऽपि तावदेव किन्तु भोजनादिव्यापारस्तु शरीरधारणावधि ॥१४॥

अर्थ :- भगवंताला शरण जात नाही तोपर्यंत लोकांकडे लक्ष दिले जाते पण भगवंताची प्रेमभक्ति करण्याकडे देहाचा उपयोग होत असल्यामुळे भोजनादि व्यापार मात्र मरेतोपर्यंत करायचे असतात.

अधिकरणमाला

लोकलज्जां परित्यज्य व्रजतां शरणं हरिम् ।
भोजनस्नानपानादित्यागः कार्योऽथवा न हि ॥८॥
कार्यो लोकपरित्यागाद्देहानासक्तितोऽपि च ।
भक्तिस्थापनयोग्यत्वाद्यावद्देहो न हीयते ॥९॥
तावत्तु भोजनादीनां व्यापारो न विरुध्यते ।
यतस्तज्जीवनेनैव भगवान् भुवि तिष्ठति ॥१०॥

शंका :- लोकलज्जा सोडून देऊन भगवंताला शरण जावे. मग त्याने भोजनस्नानपानादि व्यापाराचा त्याग करावा किंवा नाही?

पूर्वपक्ष :- लोकलज्जेचा त्याग केला असल्यामुळे व देहासक्ति नसल्यामुळे भक्ताने भोजनादि व्यापराचा त्याग करावा.

सिद्धान्त :- त्याचे (भक्ताचे) देहधारण भक्तिमार्गाच्या स्थापनेला उपयोगी असल्यामुळे देहपात होईपर्यंत भोजनादि व्यापार चालू ठेवणे भक्तिविरुद्ध होत नाही. भगवानहि भक्तिमार्गस्थापक संत जीवंत आहेत तोपर्यंत

भूतलावर राहतो.

तल्लक्षणानि वाच्यन्ते नानामतभेदात् ॥१५॥

अर्थ :- नाना मतानुसार भक्तीची लक्षणे सांगतात.॥१५॥

विषयः- भक्तेर्लक्षणनानात्वम् ।

अधिकरणमाला

तल्लक्षणानि वाच्यन्ते न वा नोऽनिर्वचोक्तितः ।
तथापि बालबोधाय वाच्यन्ते मतभेदतः ॥ (य१६-२७)

शंका :- भक्तीची लक्षणे सांगता येतात किंवा नाही?

पूर्वपक्ष :- भक्ति अनिर्वाच्य आहे, असे वचन असल्यामुळे भक्तीची लक्षणे करता येत नाहीत.

सिद्धान्त :- असे असले तरी अज्ञानी जनांना समजण्याकरिता नाना मतांनुसार तिची लक्षे सांगितली आहेत.

पूजादिष्वनुराग इति पाराशर्यः ॥१६॥

अर्थ :- भगवंताच्या पूजनात प्रेम वाटणे ही भक्ति होय असे भगवान् व्यासांचे मत आहे. ॥१६॥

विषयः- व्यासोक्तभक्तिलक्षणम् ।

अधिकरणमाला

पूजादिष्वनुरागः स्यान्न वा नो बाह्यवृत्तितः
अपेक्ष्योऽन्तर्बहिः प्रीतेरित्थं व्यासमतं स्फुटम् ॥१२॥

शंका :- भगवंताच्या पूजादि प्रकाराविषयी प्रेम वाटणे हे भक्तीचे लक्षण आहे किंवा नाही?

पूर्वपक्ष :- पूजन करणे ही बाह्यवृत्ति आहे म्हणून ती भक्ति नव्हे.

सिद्धान्त :- असे असले तरी आत असलेले प्रेमच बाहेर प्रकट होत असल्यामुळे पूजादि प्रकारांची अपेक्षा असते असे व्यासांचे स्पष्ट सांगणे

आहे.

कथादिष्विति गर्गः ॥१७॥

अर्थ :- भगवंताच्या कथा श्रवण करण्यात प्रेम वाटणे ही भक्ति होय असे गर्गाचार्यांचे मत आहे.॥१७॥

गर्गाचार्योक्तभक्तिलक्षणम् ।

अधिकरणन्यायमाला

कथादौ स्यान्नवा प्रीतिर्न ध्वंसप्रतियोगितः ।
स्यान्नित्याविर्भावशक्तेर्गर्गाचार्योक्तितोऽपि च ॥ (य१६-२८)

शंका :- भगवंताच्या कथा श्रवण करण्यात प्रीति वाटणे ही भक्ति होय किंवा नाही?

पूर्वपक्ष :- भगवंताच्या कथा नाशिवंत आहेत म्हणून त्यांचे श्रवण करण्यात प्रीति वाटणे, हे भक्तिलक्षण होऊ शकत नाही.

सिद्धांत :- असे नाही. कथाश्रवणच्या प्रेमाने नित्य भगवंताचा अविर्भाव होतो असा इतिहास असल्यामुळे भगवंताच्या कथाश्रवण करण्यात प्रेम असणे, हे गर्गाचार्यांनी सांगितलेल्या भक्तीचे लक्षण होऊ शकते.

आत्मरत्यविरोधेनेति शाण्डिल्यः ॥१८॥

अर्थ :- आत्मप्रेमाच्या अविरोधाने भगवंताचे प्रेम लागणे ही भक्ति होय, असे शाण्डिल्य ऋषि म्हणतात.॥१८॥

शंका :- भक्ति ही व्यभिचारी स्वरूप आहे किंवा अव्यभिचारी स्वरूप आहे?

पूर्वपक्ष :- श्रुतीने प्रतिपादिलेल्या आत्मप्रेमाहून भक्तीचे स्वरूप निराळे असल्यामुळे भक्ति ही व्यभिचारीस्वरूप आहे.

सिद्धांत :- आत्मस्वरूप सगुण भगवंताचे ठिकाणी आत्मप्रेमच अहंकाररहित होऊ लागले असता ती भक्ति होय, असे शाण्डिल्य

ऋषींचे मत असल्यामुळे भक्ति ही अव्यभिचारिणी म्हणजे अनन्य आहे.

विषयः - शाण्डिल्योक्त भक्तिलक्षणम् ।

अधिकरणमाला

व्यभिचारस्वरूपा वा भक्तिरव्यभिचारिणी ।
श्रौतात्मरतिपार्थक्याद्भवेत्सा व्यभिचारिणी ॥१४॥
आत्मप्रीतिर्हि भक्तिः स्यादहंतारहिता हरौ ।
शाण्डिल्यसम्मतं त्वेवं तस्मादव्यभिचारिणी ॥१५॥

शंका :- भक्ति ही व्यभिचारीस्वरूप आहे किंवा अव्यभिचारीस्वरूप आहे?

पूर्वपक्ष :- श्रुतीने प्रतिपादिलेल्या आत्मप्रेमाहून भक्तीचे स्वरूप निराळे असल्यामुळे भक्ती ही व्यभिचारीस्वरूप आहे.

सिद्धान्त :- आत्मस्वरूप सगुण भगवंताचे ठिकाणी आत्मप्रेमच अहंकाररहित होऊ लागले असतां ती भक्ती होय, असे शाण्डिल्यऋषींचे मत असल्यामुळे भक्ती ही अव्यभिचारिणी आहे.

नारदस्तु तदर्पिताखिलाचारता तद्विस्मरणे परमव्याकुलतेति ॥१९॥

अर्थ :- भगवंताला संपूर्ण आचार (कर्म) समर्पण करून भगवंताच्या क्षणभर विस्मरणाने चित्त अत्यंत व्याकुल होणे ही भक्ति होय, असे श्री नारदमुनी म्हणतात. ॥१९॥

विषयः- नारदोक्तभक्तिलक्षणम्

अधिकरणमाला

स्वप्रेमभानवद्भानं भक्तेरस्ति न चाथवा ।
अस्त्यभानं निजप्रेमव्युत्थानवदिहापि च ॥१६॥
सर्वाचारार्पितत्वाच्च विस्मृतौ व्याकुलत्वतः ।
भक्तेर्भानं सदैव स्यान्नारदीयं मतं त्विदम् ॥१७॥

शंका :- आपल्या प्रेमाचे भान होते तसे भगवद्भक्तिप्रेमाचे भान होते किंवा नाही?

पूर्वपक्ष :- व्युत्थानकाली जसे स्वप्रेमाचे भान (प्रतीति) होत नाही

त्याप्रमाणे भगवद्भक्तिप्रेमाचेहि काही प्रतिबंधामुळे अभाव (अप्रतीति) होणे शक्य आहे.

सिद्धांत :- भगवद्भक्त आपला सर्वकर्मरूप आचार भगवंताला समर्पण करीत असल्यामुळे तो भगवद्विस्मरणाच्या कल्पनेने देखील व्याकुल होतो. त्याला भगवद्भक्तिप्रेमाची अप्रतीति होण्याला अवकाशच नाही, म्हणून भगवद्भक्तिप्रेमाचे नित्य भान असते. (प्रतीति असते) असेच श्रीनारदांचे मत आहे.

अस्त्येवमेवम् ॥२०॥

अर्थ :- हे असेच आहे.॥२०॥

यथा व्रजगोपिकानाम् ॥२१॥

अर्थ :- व्रजवासी गोपिकांप्रमाणे ॥२१॥

विषय :- श्रीनारदोक्त भक्तावैतिह्यप्रमाणम्

अर्थ :- भगवान् श्रीनारदांनी सांगितलेल्या भक्तिलक्षणाचे उदाहरण.

अधिकरणमाला

भक्त्या तृप्तिर्न वा न स्यादितिहासाद्यदर्शनात्
सर्वेषां सुखरागाद्वा शुकमुक्त्यादिबोधनात् ॥१८॥
उद्धवोक्तिं परित्यज्य मुक्तिदज्ञानदायिनीम् ।
विज्ञायाप्यन्तरव्यक्तं कृष्णरक्ता व्रजस्त्रियः ॥१९॥
शुकादयो महात्मानो मुक्ताः सम्भोगवर्जिताः ।
कृष्णभोगान् वर्णयन्ति तस्माद्भक्त्यैव निर्वृतिः ॥२०॥

शंका :- भगवंताच्या प्रेमभक्तीच्या योगाने पूर्ण तृप्ति म्हणजे निर्वासन स्थिति होते किंवा नाही?

पूर्वपक्ष :- भक्तीने कोणाला निर्वासन स्थिति प्राप्त झाली, असा इतिहास नाही. सर्वांना सुखाविषयी इच्छा असल्यामुळे पूर्ण निर्वासन स्थिति बाणणे शक्य नाही. शिवाय अत्यंत वैराग्यसंपन्न अशा शुकाचार्यादिकांनाच मुक्ति म्हणजे निर्वासन स्थिति प्राप्त झाली, असे सांगितले आहे.

सिद्धान्त :- उद्धव श्रीकृष्णाचे ठिकाणी प्रेमासक्त आहे, हे जाणून ज्ञानाने मुक्ति होते असे सांगणाऱ्या त्याच्या वचनांकडे गोपिकांनी लक्ष दिले नाही. त्या भगवंताला शरण गेल्या. विषयभोगांचा त्याग करून मुक्त झालेले शुकाचार्यादि महात्मेहि श्रीकृष्णाच्या विषयभोगांचे वर्णन करतात, म्हणून भक्तीने निर्वासन स्थिति प्राप्त होते हे सिद्ध आहे.

तत्रापि न माहात्म्यज्ञानविस्मृत्यपवादः ॥२२॥

अर्थ :- तरीपण भक्तीत परमेश्वराच्या माहात्म्यज्ञानाचा विसर पडतो, हा अपवाद येत नाही. ॥२२॥

तद्विहीनं जाराणामिव ॥२३॥

अर्थ :- माहात्म्यज्ञानावाचून केलेले प्रेम जार पुरुषाच्या प्रेमाप्रमाणेच होय.॥२३॥

नास्त्येव तस्मिंस्तत्सुखसुखित्वम् ॥२४॥

अर्थ :- कारण तशा प्रेमात त्याच्या सुखाने सुखी होणे हे नसते.॥२४॥

भक्तिश्रेष्ठत्वाधिकरणम्

सा तु कर्मज्ञानयोगेभ्योऽप्यधिकतरा ॥२५॥

अर्थ :- भक्ति ही कर्म-ज्ञान-योग इत्यादि सर्व मार्गांपेक्षा श्रेष्ठ आहे.॥२५॥

अधिकरणमाला

भक्तिः परेभ्योऽप्यधिका न वा नो शुद्धिर्धियःकेवलकर्मणैव ।
योगेन याति स्थिरतां यथाहि ज्ञानाद्विमुक्तिर्भवति स्वतंत्रात् ॥२१॥
कर्मेशार्पितमेव यच्छति मनःशुद्धिं न तत्केवलम् ।
योगः स्थैर्यमपि प्रभोर्न करुणापेक्षां विना यच्छति ।
विज्ञानं परमप्यहो न लभते निर्गर्वतां यां विना ।

प्रारब्धाभिभवो ययाधिकतमा तेभ्यस्ततः स्यादियम् ॥२२॥

शंका :- भक्ति इतर सर्व कर्मादि मार्गापेक्षा श्रेष्ठ आहे किंवा नाही?

पूर्वपक्ष :- केवळ कर्माने बुद्धि शुद्ध होते. योगाने एकाग्र होते व ज्ञान स्वतंत्रपणे मुक्ति प्राप्त करून देऊ शकते. (म्हणून भक्ती श्रेष्ठ होऊ शकत नाही)

सिद्धांत :- नुसत्या कर्माने चित्तशुद्धि होत नसून ईश्वराला अर्पण केलेल्या कर्माने चित्ताची शुद्धि होते. परमेश्वराच्या कृपेवांचून नुसत्या योगाभ्यासानेहि चित्त एकाग्र होऊ श्कत नाही. शुद्ध अपरोक्ष निरहंकारपूर्वक ज्ञानहि भक्ति प्राप्त झाल्याशिवाय होत नाही व भक्तीच्या योगाने प्रारब्धाचा अभिभव होतो म्हणून भक्ति ही इतर सर्व साधनांपेक्षा श्रेष्ठ आहे.

.....

(अधुना मराठीभाषानुवादसहिता केवला भक्त्यधिकरणन्यायमाला : - संपादक.)

.....

ईश्वरस्याप्यभिमानिद्वेषित्वाद्दैन्यप्रियत्वाच्च ॥२७॥

अर्थ :- अभिमानी लोक ईश्वराचा द्वेष करतात व गर्वरहित दीन लोक ईश्वरावर प्रेम करतात.॥२७॥

भगवतः दयासिन्धुत्वम्

अधिकरणमाला

ईश्वरः करुणामूर्तिर्न वा नोऽस्ति समत्वतः ।
मतो द्वेषीति गर्विष्ठैर्यथा स्तेनैर्दिवाकरः ॥२३॥
दीनः निस्साधनत्वादेवं मन्यन्ते प्राणतः प्रियम् ।
तस्मात्पूर्णदयासिन्धुर्भगवान्नात्र संशयः ॥२४॥

शंका :- भगवान् करुणासमुद्र आहे किंवा नाही?

पूर्वपक्ष :- तो सम असल्यामुळे करुणासमुद्र नाही.

सिद्धान्त :- ज्याप्रमाणे चोर प्रकाशरूप सूर्याची निंदा करतात, त्याप्रमाणे अहंकारी लोक त्याला द्वेष करणारा समजतात व सर्व साधन सोडून व दीन होऊन शरण गेलेले भगवंताला प्राणाहून प्रिय समजतात, म्हणून भगवान् पूर्ण दयासिंधू आहे यात संशय नाही.

तस्या ज्ञानमेव साधनमित्येके ॥२८॥

अर्थ :- भक्तीचे ज्ञान हेच एक साधन आहे असे कित्येक म्हणतात.

भक्तिसाधनविचार

अधिकरणमाला

ज्ञानसाध्यास्ति भक्तिर्वा न नो विषयभेदतः ।
ज्ञानसाध्या वदन्त्येक आत्मरत्यविरुद्धतः ॥२५॥

शंका :- भक्ती ज्ञानाने साध्य आहे किंवा नाही?

पूर्वपक्ष :- आमचा व विषयांचा भेद असल्यामुळे अद्वैतज्ञान होऊ शकत नाही. म्हणून ज्ञानाने भक्ती साध्य होऊ श्कत नाही.

सिद्धांत :- भक्ती ही आत्मप्रेमाच्या विरोधी नसल्यामुळे ज्ञानाने भक्ती होते असे कित्येक म्हण्तात.

अन्योन्याश्रयत्वमित्यन्ये ॥२९॥

अर्थ :- कित्येक भक्ती व ज्ञान यांचे अन्योन्याश्रयत्व मानतात. ॥२९॥

अधिकरणमाला

भक्तिविज्ञानयोरन्योन्याश्रयः कल्पते न वा ।
प्रकल्पनीयो नैवास्मिन् स्वतन्त्रत्वाद् द्वयोरपि ॥२६॥
ज्ञानाज्जीवेश्वरयोरैक्यं भक्त्या तद्गर्वसंहृतिः ।
तस्मादन्योन्याश्रयेति वदन्ति महाधियः ॥२७॥

शंका :- भक्ती व ज्ञान यांचे सहकार्य कल्पिता येते किंवा नाही?

पूर्वपक्ष :- भक्ती व ज्ञान या दोघांना स्वतंत्रत्व असल्यामुळे त्यांचे

अन्योन्याश्रयत्व मानता येत नाही.

सिद्धांत :- ज्ञानाने जीवशिवांचे ऐक्य होत असून भक्तीने अहंकाराचा नाश होतो, म्हणून महान बुद्धिमान लोकांनी दोघांचे अन्योन्याश्रयत्व सांगितले आहे.

स्वयं फलरूपतेति ब्रह्मकुमारः ॥३०॥

भक्तेः स्वयं फलरूपता

अधिकरणमाला

भक्तिस्साध्याऽथवाऽसाध्याज्ञानादिसाधनैः ।
अज्ञाननाशे ज्ञानादेस्तयोपक्षयदर्शनात् ॥२८॥
परप्रेमास्पदत्वात् स्यादानन्दः सुरसः फलम् ।
स्वयं तद्रूपतोऽसाध्या ब्रह्मानन्दसम्मता ॥२९॥

शंका :- भक्ती साध्य आहे किंवा असाध्य आहे?

पूर्वपक्ष :- ज्ञानादि साधनांनी भक्ती ही साध्य आहे. अज्ञानाचा नाश झाल्यावर भक्तीच्या योगाने ज्ञानादिक विश्राम पावतात असे दिसते.

सिद्धान्त :- भक्ती ही परमप्रेमरूप असल्यामुळे तिचे ब्रह्मानंद हेच गोड फळ आहे. भक्ती तद्रूपच असल्यामुळे ती असाध्य आहे असे भगवान् श्रीनारद म्हणतात.

राजगृहभोजनादिषु तथैव दृष्टत्वात् ॥३१॥

अर्थ :- राजगृह किंवा भोजन इत्यादि ठिकाणीहि पण तसेच दिसत असते.॥३१॥

न तेन राजपरितोषः क्षुधाशान्तिर्वा ॥३२॥

अर्थ :- त्याने (नुसत्या ज्ञानाने) राजाची प्रसन्नता होत नाही किंवा क्षुधेची शांती होत नाही.॥३२॥

तस्मात्सैव ग्राह्या मुमुक्षुभिः ॥३३॥

अर्थ :- म्हणून मुमुक्षुंनी भक्तीचाच आश्रय करावा. ॥३४॥

भक्तेर्ग्राह्यत्वम्

अधिकरणमाला

मुमुक्षुणां न वा भक्तिर्न ज्ञानोत्तरदर्शनात् ।
मुक्तौ सा फलरूपास्ते बीजरूपा मुमुक्षुषु ॥३०॥
साधनानि परित्यज्य कर्तृबुद्धिर्युतानि वै ।
मुक्त्यर्थमपि भक्तिर्हि वासनाक्षयकारिणी ॥३१॥

शंका :- मुमुक्षूंनी भक्ती करावी किंवा नाही?

पूर्वपक्ष :- पुढे ज्ञानच रहात असल्यामुळे मुमुक्षूंना भक्तीची आवश्यकता नाही.

सिद्धांत :- भक्ति ही मुक्तदशेत फलरूप असून मुमुक्षुदशेत ती बीजरूप असते. कर्तृबुद्धी ठेवून करावी लागणरी सर्व साधने सोडून द्यावी. भक्ति हीच वासनेचा क्षय करणारी आहे म्हणून मुक्तिकरिता तिचाच आश्रय करावा.

तस्याः साधनानि गायन्त्याचार्याः ॥३४॥

अर्थ :- निरनिराळ्या आचार्यांनी भक्तीची साधने सांगितली आहेत.॥३४॥

भक्तेः साधनानि

अधिकरणमाला

तत्साधनानि नो वा स्युर्न स्वयंफलरूपतः ।
कल्पयन्त्यपि चाचार्याः शिशूनां बोधहेतवे ॥३२॥

शंका :- भक्तीची साधने आहेत किंवा नाहीत?

पूर्वपक्ष :- भक्ती ही स्वतः फलरूप असल्यामुळे तिची साधने नाहीत.

सिद्धांत :- तुम्ही म्हणता तसे असले तरी अज्ञांना भक्तीचा बोध करण्याकरिता आचार्यांनी भक्तीची साधने सांगितली आहेत.

तत्तु विषयत्यागात्संगत्यागाच्च ॥३५॥

अर्थ :- भक्ती ही ही विषयभेगांचा व विषयी लोकांच्या संगतीचा त्याग

केल्याने प्राप्त होते.

अधिकरणन्यायमाला

त्याज्यौ तौ भोगसंगौ च नस्तौ तत्सुलभोक्तितः ।
अनन्यलक्षणाद् भक्तेस्त्याज्यौ तौ प्रतिबन्धकौ ॥३३॥

शंका :- विषयभोग व विषयी लोकांचा संग ह्या दोघांचा त्याग करावा किंवा नाही?

पूर्वपक्ष :- विषयभोग व विषयी लोकांचा संग हे दोन्ही सुलभ प्राप्त होणारे असल्यामुळे त्यांचा त्याग करिता येत नाही.

सिद्धांत :- भगवंताला अनन्य होणे हेच भक्तीचे लक्षण आहे. अशा त्या भक्तीला हे दोन्ही प्रतिबंधक असल्यामुळे त्यांचा त्यागच केला पाहिजे.

अव्यावृत भजनात् ॥३६॥

अर्थ :- भगवंताच्या सतत भजनाने भक्ती प्राप्त होते.

अधिकरणमाला

विहिता भजनावृत्तिर्न वा नो ज्ञानसाम्यता ।
आवृत्तिर्विहिता नित्या चिद्विदां वृत्तिरोधवत् ॥३४॥

शंका :- भगवंताच्या भजनाची आवृत्ति विहित आहे किंवा नाही?

पूर्वपक्ष :- भक्तीचे ज्ञानाशी साम्य असल्यामुळे ज्ञानाची आवृत्ति जशी विहित नाही तशी भक्तीची आवृत्ति करणे विहित नाही.

सिद्धांत :- (जसा ज्ञान्याला नित्य वृत्तिरोध विहित आहे त्याप्रमाणे भक्ताला भजनाची नित्य आवृत्ति विहित आहे)

लोकेऽपि भगवद्गुणश्रवणकीर्तनात् ॥३७॥

अर्थ :- (भक्ती प्राप्त होते) म्हणून लोकांमध्ये भगवत्प्राप्तिकरता भगवंताच्या गुणांचे श्रवण कीर्तन केले जात असल्यामुळे (भजनाची आवृत्ति योग्य आहे)

मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवद्कृपालेशाद्वा ॥३८॥

अर्थ :- भक्ती ही मुख्यतः संतांच्या कृपेने किंवा भगवत्प्रसादाने प्राप्त होते.

महत्कृपा भगवत्कृपा वा भक्तेः साधनम्

अधिकरणमाला

भक्तिलाभोऽस्ति नित्यो वाऽनित्योऽस्ति साध्यतः ।
ईशसाधुकृपादानाद् (१)भक्तिलाभोऽस्ति सर्वदा ॥३५॥
(पाठान्तर- भक्तिर्नित्यैव लभ्यते ॥३५॥)

शंका :- भक्तीचा लाभ नित्य आहे की अनित्य आहे?

पूर्वपक्ष :- भक्ती साध्य आहे म्हणून भक्तीचा लाभ अनित्य आहे.

सिद्धांत :- सत्पुरुष व परमेश्वर यांनी कृपा केली असता भक्तीचा नित्य लाभ होतो.

सत्संगस्तु दुर्लभोऽगम्योऽमोघश्च ॥३९॥

अर्थ :- संतांची संगति दुर्लभ आहे. तसेच तिचे महत्व कळणे कठीण आहे. पण ती प्राप्त झाल्यास कधी व्यर्थ जात नाही.

लभ्यते तत्कृपयैव ॥४०॥

अर्थ :- त्यांच्या कृपेनेच भक्ती प्राप्त होते.॥४०॥

तस्मिंस्तज्जने भेदाभावात् ॥४१॥

अर्थ :- भगवंत आणि भगवंताचे भक्त यांच्यात मुळीच भेद नसतो.॥४१॥

तदेव साध्यतां तदेव साध्यताम् ॥४२॥

अर्थ :- म्हणून संतांची संगतीच साधावी, संतांची संगतीच साधावी.४२

दुस्संगः सर्वथैव त्याज्यः ॥४३॥

अर्थ :- दुर्जनांच्या संगतीचा सर्वथा त्याग करावा. ॥४३॥

अधिकरणन्यायमाला

भक्तैः कुसंगस्त्यागो वा न सर्वसमधीरणात् ।
त्याज्यः कुसंगः साम्येऽपि सिद्धभोगनिरोधवत् ॥३६॥

शंका :- भक्तांनी दुर्जनांच्या संगाचा त्याग करावा किंवा नाही?
पूर्वपक्ष :- सर्वत्र समबुद्धि असावे, असे सांगितले असल्यामुळे भक्ताने दुर्जनांच्या संगाचा त्याग करण्याची आवश्यकता नाही.
सिद्धांत :- ज्याप्रमाणे सिद्धपुरुष विषयभोगाचा त्याग करतात त्याप्रमाणे भक्तानेहि समबुद्धि असली तरी दुर्जनांच्या संगाचा त्याग करावा.

कामक्रोधमोहस्मृतिभ्रंशबुद्धिनाश सर्वनाशकारणत्वात् ॥४४॥

अर्थ :- दुःसंग हा काम, क्रोध, मोह, स्मृतिभ्रंश व बुद्धिनाश (करणारा) असा (असून) सर्वनाश करणारा आहे.॥४४॥

तरंगायिताऽपि संगात्समुद्रायन्ति ॥४५॥

अर्थ :- हे प्रथम तरंगासारखे असले तरी दुःसंगाने समुद्रासारखे अफाट वाढतात.॥४५॥

कस्तरति कस्तरति मायां, यः संगांस्त्यजति,

यो महानुभावं सेवते, निर्ममो भवति ॥४६॥

अर्थ :- माया कोण तरतो, कोण तरतो? जो सर्व संग सोडून एकचित्ताने संताची सेवा करतो व जो ममताशून्य होतो तो.॥४६॥

मायातरणोपाय
अधिकरणमाला

भक्त्या निवर्त्यो मायांशो न वा नो ज्ञानबाधनात् ।
निवर्त्यो दुःखरूपोंऽशो मुक्तदैवाभिभूतिवत् ॥३७॥
(मुक्तशब्देनात्र जीवन्मुक्तो ग्राह्यः)

शंका :- भक्तीने मायांश निवृत्त होतो किंवा नाही?
पूर्वपक्ष :- आत्मज्ञानाने मायेचा बाध होतो असे सांगितले असल्यामुळे

भक्तीने माया निवृत्त होत नाही.
सिद्धांत :- जीवन्मुक्त पुरुषाच्या प्रारब्धाचा भक्तीने अभिभव होतो. यावरून भक्तीने दुःखरूप मायांश निवृत्त होतो, हे उघड आहे. (मुक्त शब्दाने येथे जीवन्मुक्त पुरुष घ्यावा.)

यो विविक्तस्थानं सेवते, यो लोकबन्धमुन्मूलयति, निस्त्रैगुण्यो

भवति, योगक्षेमं त्यजति ॥४७॥

अर्थ :- जो एकांताचे सेवन करतो , लोकबंधाला समूळ उपटून टाकतो, त्रिगुणरहित होतो व योगक्षेमाची काळजी वाहत नाही. ॥४७॥

यः कर्मफलं त्यजति कर्माणि संन्यसति

ततो निर्द्वन्द्वो भवति ॥४८॥

अर्थ :- जो कर्मफळाची इच्छा करीत नाही व काम्यकर्माचा त्याग करतो म्हणून जो द्वंद्वरहित होतो ॥४८॥

वेदानपि संन्यसति, केवलमविच्छिन्नम् अनुरागं लभते ॥४९॥

अर्थ :- जो वैदिक कर्मांचा देखील त्याग करतो व केवळ अखंड भगवंताचे प्रेमच संपादन करतो, ॥४९॥

स तरति स तरति स लोकांस्तारयति ॥५०॥

अर्थ :- तोच माया तरतो, तोच माया तरतो व तो लोकांनाहि तारतो. ॥५०॥

अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपम् ॥५१॥

अर्थ :- प्रेम हे शब्दाने सांगता येत नाही.॥५१॥

प्रेम्णोऽनिर्वचनीयत्वम्
अधिकरणमाला

प्रेमानिर्वचनीयं वा न, नो तच्छास्त्रैर्निबोधनात् ।
(+)स्वानन्दत्वादनिर्वाच्यं शास्त्रं बालार्थकल्पितम् ॥३८॥
(+)पाठान्तर- स्वसंवेद्यादनिर्वाच्यं शिशुबोधाय शासनम् ॥

शंका :- प्रेम हे बोलण्याजोगे नाही, असे आहे किंवा नाही?
पूर्वपक्ष :- (वरील संशय योग्य नाही) शास्त्राने प्रेमाचे स्वरूप वर्णन केले असल्यामुळे ते बोलण्याजोगे आहे.
सिद्धांत :- प्रेम हे स्वानंदरूप असल्यामुळे शब्दाने सांगण्याजोगे नाही. शास्त्राने जे प्रेमाचे वर्णन केले आहे ते अज्ञान्यांना बोध करण्याकरता आहे.

मूकास्वादनवत् ॥५२॥

अर्थ :- ते प्रेम मुक्या मनुष्याच्या रस आस्वादनाप्रमाणे आहे. ॥५२॥

प्रकाशते क्वापि पात्रे ॥५३॥

अर्थ :- ही भक्ती पात्रता असल्यास कोठेही व कोण्याही जातीत प्रगट होऊ शकते.

भक्तिपात्रम्

अधिकरणमाला

प्रेमप्रकाशपात्रं वा तदनिर्वाच्यतो नहि ।
पात्रं धीरीश्वरानन्या मुक्तात्मकृतबुद्धिवत् ॥३९॥

शंका :- प्रेमभक्ती प्रगट होण्याकरता (एखादी) पात्रता लागते किंवा नाही? म्हणजे प्रेमभक्ती करण्याकरता अधिकारी असावा लागतो किंवा नाही?
पूर्वपक्ष :- भक्ती ही अनिर्वचनीय असल्यामुळे ती प्रगट होण्याकरता पात्रतेचा प्रश्न उद्भवत नाही.
सिद्धांत :- मुक्तपुरुषाने आत्मस्वरूपाचे ठिकाणी अनन्य केलेल्या बुद्धिप्रमाणे ज्याने सगुण परमेश्वराचे ठिकाणी आपली बुद्धि अनन्य केली तो या

भक्तीचा अधिकारी होय.

गुणरहितं कामनारहितं प्रतिक्षणवर्धमानम् अविच्छिन्नं सूक्ष्मतरम् अनुभवस्वरूपम् ॥५४॥

अर्थ :- प्रेम हे सत्त्वादिगुणरहित, विषयेच्छारहित, क्षणोक्षणी वाढणारे व अखंड असून सूक्ष्म असे अनुभवस्वरूप आहे.

तत्प्राप्य तदेवावलोकयति, तदेव शृणोति, तदेव भाषयति, तदेव चिन्तयति ॥५५॥

अर्थ :- ते प्राप्त झाले असता भक्त प्रेमच पाहतो, प्रेमाच्याच गोष्टी ऐकतो व वदवितो व प्रेमाचेच चिंतन करतो. ॥५५॥

गौणी त्रिधा गुणभेदाद् आर्तादिभेदाद् वा ॥५६॥

अर्थ :- गौणी भक्ती सात्त्विक, राजस, तामस किंवा आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी अशी तीन प्रकारची आहे.

गौणीभेदाः

अधिकरणमाला

गौणीभक्तिर्भवेद्वा न हि परमपरप्रेमविद्यादिसाध्या ।
विज्ञानं तत्प्रयुक्तं प्रभवति च ततो धर्मसाध्या सुगौणी ॥४०॥
त्रेधा वाऽऽर्तादिभेदाद् गुणविषमतया किन्तु नो सा उपास्तिः ।
कर्मोपास्तौ सहायं यदुपतिचरणोक्तेर्न गौण्यावपेक्ष्यम् ॥४१॥

शंका १ :- गौणी भक्ती होते किंवा नाही?
पूर्वपक्ष :- भक्ती ही परमप्रेमरूप आत्मज्ञानाने साध्य होणारी असल्यामुळे गौणीभक्ती होऊ शकत नाही.
सिद्धांत :- गौणी भक्तीनेच आत्मज्ञान होत असून ती ईश्वरार्पण बुद्धीने केलेल्सा धर्माचरणाने साध्य होते.
शंका २ :- गुणवैषम्यानुसार किंवा आर्तादि भेदाने तीन प्रकारची

होणारी ही गौणीभक्ती उपासना होय किंवा नाही?
पूर्वपक्ष :- गौणीभक्तीत कर्माची अपेक्षा असल्यामुळे गौणीभक्ती उपासनाच होय.
सिद्धांत :- भगवंताच्या वचनावरून उपासनेलाच कर्माची अपेक्षा आहे, गौणीभक्तीत नाही, असे सिद्ध असल्यामुळे गौणीभक्ती ही उपासना नव्हे.

उत्तरस्मादुत्तरस्मात् पूर्वपूर्वा श्रेयाय भवति ॥५७॥

अर्थ :- उत्तर उत्तर भक्तीपेक्षा पूर्वपूर्व भक्तिप्रेम हितकर होय.॥५७॥

अन्यस्मात्सौलभ्यं भक्तौ ॥५८॥

अर्थ :- इतर सर्व साधनांपेक्षा भक्तीत सुलभता आहे. ॥५८॥

प्रमाणन्तरस्यानपेक्षत्वात् स्वयंप्रमाणत्वात् ॥५९॥

अर्थ :- भक्तीला दुसऱ्या कोणत्याहि प्रमाणाची अपेक्षा नसल्यामुळे ती स्वयंप्रमाणरूप आहे

भक्तेः स्वयंप्रमाणत्वम्

अधिकरणन्यायमाला

मानापेक्षास्ति वा भक्तौ न वा नो मेयरूपतः ।
आत्मप्रीतिः स्वयंमानात् मानापेक्षा *न चिन्त्यते ॥४२॥
(*पाठान्तर- वृथैव हि)

शंका :- भक्तिसिद्धीला प्रमाणाची अपेक्षा आहे किंवा नाही?
पूर्वपक्ष :- भक्ती ही प्रमाणाने कळणारी अशी वस्तु असल्यामुळे तिला प्रमाणाची अपेक्षा आहे.
सिद्धांत :- भक्ती ही आत्मप्रेमच असून स्वयंप्रमाणरूप असल्यामुळे तिच्या सिद्धीला दुसऱ्या प्रमाणाची आवश्यकता नाही.॥४२॥

शान्तिरूपात्परमानन्दरूपाच्च ॥६०॥

अर्थ :- ती निर्वासनरूप व परमानन्दरूप आहे. ॥६०॥

लोकहानौ न चिन्ता कार्या, निवेदितात्मलोकवेदत्वात् ॥६१॥

अर्थ :- भक्ताने स्वतःला, लोकांना व वेदांना परमेश्वरार्पण केले असल्यामुळे लोकांच्या हानीची चिंता त्याने करू नये.॥६१॥

अधिकरणमाला

शोकः स्याद्वा न लोकार्थो स्याद्वै भूतदयेरणात् ।
लोकवेदाद्यर्पितत्वात् शोकचिन्तां परित्यजेत् ॥४३॥
सदयो गोपिकानाथः स लोकानुद्धरिष्यति ।
हानेः प्राग्वा दयाप्यस्तु न हानौ शोचनं वरम् ॥४४॥

शंका :- भक्ताला लोकांच्या हानीबद्दल शोक होईल किंवा नाही?
पूर्वपक्ष :- भक्ताच्या ठिकाणी भूतदया असते असे सांगितले असल्यामुळे लोकहानि झाली असता भक्त शोकाकुल होतो.
सिद्धांत :- भक्त, लोक-वेद इत्यादिक भगवंताला अर्पण करीत असल्यामुळे त्यांनी लोकांच्या हानीबद्दल शोक किंवा चिंता करता कामा नये. परमेश्वर परमदयाळु आहे. तो लोकांचा संकटातून उद्धार करीलच.
- लोकांची हानी होण्यापूर्वी भक्ताने दया करावी पण त्यांच्या हानीबद्दल शोक किंवा चिंता करणे योग्य नाही.

न तदसिद्धौ लोकव्यवहारो हेयः
किन्तु फलत्यागस्तत्साधनं च कार्यमेव ॥६२॥

अर्थ :- भक्ति प्राप्त होत नाही तोपर्यंत लोकव्यवहार सोडू नये. पण विषयरूप फलाचा त्याग व भक्तीचे साधन करीत रहावे. ॥६२॥

स्त्री-धन-नास्तिकचरित्रं न श्रवणीयम् ॥६३॥

अर्थ :- स्त्री, धन, नास्तिक यांचे चरित्र ऐकू नये. ॥६३॥

अभिमानदम्भादिकं त्याज्यम् ॥६४॥

अर्थ :- अभिमान दंभाज्ञादिक यांचा त्याग करावा ॥६४॥

तदर्पिताखिलाचारःसन्कामक्रोधाभिमानादिकं
तस्मिन्नेव करणीयम् ॥६५॥

अर्थ :- सुपूर्ण विहित असे वैदिक व लौकिक आचरण भगवंताला समर्पण करून काम क्रोध अभिमान इत्यादि सर्व विकार त्याच्या (भगवंताच्या) विषयीच धारण करावे ॥६५॥

त्रिरूपभंगपूर्वकं नित्यदास्य-नित्यकान्ताभजनात्मकं
प्रेम कार्यं प्रेमैव कार्यम् ॥६६॥

अर्थ :- भज्य परमात्मा, भजन करणारे आपण व भजन असा त्रिविध भेद मनात न आणता नित्य दासभावाने भगवंताचे प्रेम करावे. एवढेच नाही तर नुसते प्रेमच करावे ॥६६॥

अविच्छिन्नं प्रेम कार्यम्

अधिकरणमाला

प्रेमयोग्यो ह्यस्ति वा नो न हि ज्ञानेन निर्वृतेः ।
ज्ञानाभिमानसम्भूतेः प्रेमयोग्यः परमेश्वरः ॥४६॥
दास्यकान्तात्मकं प्रेम चैककालोऽस्ति वा न हि ।
वक्ष्यमाणासक्तिभेदाल्लोकेप्येवमदर्शनात् ॥४७॥
मनोर्वाक्कर्मभिर्दास्यं (१)कान्ताभजनमात्मना ।
एककालेऽपि तत्सिद्धिर्भेदोक्तिर्मध्यमार्थगा ॥४८॥

(टीप - १. लोकेऽपि या कान्तप्रियाकामिनी सा किं कान्तचरणानुगामिनी न भवति? अर्थः- व्यवहारांतसुद्धा पतीला प्रिय असलेली स्त्री पतीच्या चरणाची सेवा करीत नाही काय?)

शंका १ :- भगवान् केवळ प्रेम करण्याला योग्य आहे किंवा नाही?

पूर्वपक्ष :- आत्मज्ञानानेच सर्वसुख प्राप्त होते असे सांगितले आहे म्हणून परमेश्वर केवळ प्रेम करण्याला योग्य नाही.

सिद्धांत :- आत्मज्ञानानंतर ज्ञानाहंकार उत्पन्न होतो म्हणून परमेश्वर

केवळ प्रेम करण्यालाच योग्य आहे.

शंका २ :- दास्य किंवा कान्ताभावाने एकाच काली प्रेम होऊ शकते किंवा नाही?

पूर्वपक्ष :- दास्य किंवा कान्ता या प्रेमभावात भेद असल्यामुळे व लोकातहि तसे दिसून येत नसल्यामुळे या दोन्ही भावांनी एककाली प्रेम करता येत नाही.

सिद्धांत :- मन, वाणी व कर्म यांच्या योगाने दास्यप्रेम व आत्मरूपाने कान्ताप्रेम करता येत असल्यामुळे दोन्ही भावांनी एकाच काली प्रेम करता येते. त्यांचा भेद मध्यम अधिकाऱ्यांकरिता सांगितला आहे.

भक्ता एकान्तिनो मुख्याः ॥६७॥

अर्थ :- एकान्तभक्तच मुख्य होत.॥६७॥

मुख्यभक्तिलक्षणम्

अधिकरणन्यायमाला

भक्ता एकेश्वरा मुख्या वानेकेश्वरबुद्धयः ।
अश्वादिनमनोक्तेः स्युर्मुख्याश्चानेकबुद्धयः ॥४९॥
नमनं सर्वभूतेभ्य एकेश्वरधियैव हि ।
तस्मदेकान्तिनो मुख्या 'एको देव'इति श्रुतेः ॥५०॥

शंका :- एक ईश्वर मानून भजन करणारे मुख्य भक्त होत किंवा नाहीत?

पूर्वपक्ष :- एक ईश्वर मानून भजन करणारे मुख्य भक्त नव्हत, कारण गाढवादिकांना नमस्कार करावा असे सांगितले असल्यामुळे अनेक ईश्वर मानून भजन करणरेच मुख्य भक्त होत.

सिद्धांत :- 'एको देवः सर्वभूतेषु गूढः' एक देवच सर्व भूतांचे ठिकाणी व्यपक आहे, असे सांगूनच श्रुतीने सर्व भूतांना नमस्कार करण्यास सांगितले आहे; म्हणून एक ईश्वर मानून भजन करणारे भक्त मुख्य

होत.

कण्ठावरोध-रोमाञ्चाश्रुभिः परस्परं लपमानाः

पावयन्ति कुलानि पृथिवीं च ॥६८॥

अर्थ :- प्रेमाने कण्ठ दाटून येत, अंगावर रोमाञ्च उठत व डोळ्यातून अश्रू वाहात परस्परांशी भगवंताच्या चरित्राच्या गोष्टी करणारे कुळाला व पृथ्वीलाहि पावन करतात.

तीर्थी कुर्वन्ति तीर्थानि, सत्कर्मी कुर्वन्ति कर्माणि,

सच्छास्त्री कुर्वन्ति शास्त्राणि ॥६९॥

अर्थ :- ते तीर्थांना तीर्थरूप करतात, कर्मांना सत्कर्मे करतात व शास्त्रांना सच्छास्त्र करतात ॥६९॥

तन्मयाः ॥७०॥

अर्थ :- कारण ते भक्तीने भगवन्मयच होऊन जातात. ॥७०॥

मोदन्ते पितरो, नृत्यन्ति देवताः, सनाथा चेयं भूर्भवति ॥७१॥

अर्थ :- भक्तांना पाहून पितर आनंदित होतात, देवता आनंदाने नाचतात, त्यांच्या योगाने पृथ्वी सनाथ होते.

नास्ति तेषु जाति-विद्या-रूप-कुल-धन-क्रियादि भेदः ॥७२॥

अर्थ :- जाति-विद्या-रूप-कुल-धन-क्रिया इत्यादिकांमुळे भक्त भिन्न होत नाहीत.॥७२॥

सर्वेषां भक्तानां समता

अधिकरणमाला

भक्ताः समा वा विषमा भवन्ति । वर्णादिभेदाद् विषमाः सदैव ।

शूद्रादयो मां हि प्रयान्ति वाक्यात् । लोकेऽपि दृष्टे सदा समास्ते ॥५१॥

शंका :- भक्त सम असतात की विषम असतात?

पूर्वपक्ष :- जाति इत्यादि निरनिराळ्या भेदांमुळे भक्त नेहमी विषमच असतात.

सिद्धांत :- शूद्रादिक देखील भक्तीने मला प्राप्त होतात, असे म्हटले असल्यामुळे सर्व भक्त समच असतात.दृष्ट अशा मृत्युलोकातहि ते समच असतात.

अत्र स्मृतिः

व्याधस्याचरणं ध्रुवस्य च वयो विद्या गजेन्द्रस्य च का ।
का जातिर्विदुरस्य यादवपतेरुग्रस्य किं पौरुषम ।
कुब्जायाः कमनीयरूपमधिकं किं सुदाम्नो धनम् ।
भक्त्या तुष्यति केवलं न तु गुणैर्भक्तिप्रियः श्रीपतिः ॥

अर्थ :- व्याधाचे आचरण काय चांगले होते? ध्रुवाचे काय मोठे वय होते? गजेन्द्राला काय विद्या येत होती? विदुराची काय चांगली जाति होती? यादवांचा राजा उग्रसेन याचा कोणता पराक्रम होता? पूतनेचे कोणते कोणते अत्यंत सुंदर रूप होते? सुदाम्यापाशी काय धन होते? पण भगवान् एका भक्तीनेच वश होतो; गुणादिकांनी प्रसन्न होत नाही. त्याला एक प्रेमच पाहिजे असते.

यतस्तदीयाः ॥७३॥

अर्थ :- कारण ते भगवंताचे असतात. ॥७३॥

वादो नावलम्ब्यः ॥७४॥

अर्थ :- वादाचा अवलंब करू नये ॥७४॥

वादनिषेध

अधिकरणमाला

वादः कार्यो न वा कार्यो मानयुक्त्यादिभिर्यतः ।
लोके सर्वत्र सिद्धिस्स्यात् वादोऽतो भक्तिसिद्धये ॥५२॥

लोकाः प्रियतमे मानापेक्षा घ्नन्तीति दृश्यते ।
आत्मप्रेम्णोऽप्यबाध्यत्वात् बुधो वादं समुत्सृजेत् ॥५३॥

शंका :- वाद करावा किंवा नाही?

पूर्वपक्ष :- ज्याअर्थी प्रमाण, युक्ति इत्यादिकांनी लोकांमध्ये सिद्धांताची सिद्धि करीत असतात त्याअर्थी भक्तिसिद्धिकरिताहि वादाचा आश्रय करावा.

सिद्धांत :- लोकहि अत्यंत प्रिय वस्तूचे ठिकाणी प्रमाणाची कधी अपेक्षा करीत नाहीत, असे दिसते; म्हणून आत्मप्रेमरूप भक्ति कशानेहि बाधित होणारी नसल्यामुळे शहाण्यांनी वादाचा आश्रय करू नये.

बाहुल्यावकाशादनियतत्वाच्च ॥७५॥

अर्थ :- भगवन्ताला सोडून अवांतर विषयांकडे धाव घेण्याकरिता चित्ताला फार अवकाश मिळत असतो व त्याला सीमाहि नाही. ॥७५॥

भक्तिशास्त्राणि मननीयानि तदुद्बोधक कर्माणि करणीयानि ॥७६॥

अर्थ :- भागवतादि भक्तिशास्त्राचे मनन करावे व त्यातील भक्तिउद्बोधक कर्मे करावी. ॥७६॥

भक्तिशास्त्राणां मननादि
अधिकरणमाला

पठनं मननं कार्यं भक्तिशास्त्रस्य वा न हि ।
माननपेक्षणाद् भक्तेः शास्त्राभ्यासो न चोचितः ॥५४॥
जेतुमिच्छामहंकारं त्यक्त्वा प्रेमदृढाप्तये ।
भक्तिशास्त्रं गुरोर्वक्त्रात् बालैर्नियतमभ्यसेत् ॥५५॥
भक्त्युद्बोधक-कर्माणि कर्तव्यान्यथवा न हि ।
तत्स्वयं फलरूपत्वात् कर्मापेक्षा न सम्भवेत् ॥५६॥
प्रेम्णः स्वयंफलस्यापि नाशुद्धे चेतसि स्थितिः ।
अतस्तत्सम्बोधकानि करणीयानि शास्त्रतः ॥५७॥

शंका १ :- भक्तिशास्त्राचे पठन करावे किंवा नाही?

पूर्वपक्ष :- भक्तीला प्रमाणाची अपेक्षा नसल्यामुळे भक्तिशास्त्राचे पठन-मननादि अभ्यास करणे योग्य नाही.

सिद्धांत :- भगवत्प्रेम दृढ होण्याकरता ज्ञानाहंकार टाकून देऊन साधकाने गुरूच्या मुखाने भक्तिशास्त्राचा नियमाने पठनमननादिरूप अभ्यास करावा.

शंका २ :- भक्तिशास्त्रातील उद्दबोधक म्हणून प्रतिपादन केलेली कर्मे करावी किंवा नाही?

पूर्वपक्ष :- भक्ति ही स्वयंफलरूप असल्यामुळे तिला कर्माची अपेक्षा संभवत नाही.

सिद्धांत :- प्रेम हे स्वतः फलरूपच असले तरी अज्ञान्याचे ठिकाणी त्याची प्राप्ती नसल्यामुळे भक्तिशास्त्राने प्रेमउद्बोधक सांगितलेली कर्मे अवश्य करावी.

सुखदुःखेच्छालाभदित्यक्ते काले प्रतीक्ष्यमाणे
क्षणार्धमपि व्यर्थं न नेयम् ॥७७॥

अर्थ :- सुख, दुःख, इच्छा, काम याचा त्याग केल्यावर मग अर्धक्षण देखील भगवंतावाचून व्यर्थ जावू देऊ नये. ॥७॥

अहिंसा-सत्य-शौच-दयास्तिक्य-चारित्र्याणि परिपालनीयानि ॥७८॥

अर्थ :- अहिंसा, सत्य, शौच, दया, आस्तिक्य यांचे आचरण करावे. ॥७८॥

सर्वदा सर्वभावेन निश्चिन्तितैर्भगवानेव भजनीयः ॥७९॥

अर्थ :- निश्चिन्त झालेल्यांना सदासर्वदा दास्य, लालन, वात्सल्य, माधुर्य इत्यादि भावांनी भगवंतच भजन करण्याला योग्य आहे.॥७९॥

स कीर्त्यमानः शीघ्रमेवाविर्भवति अनुभावयतिच भक्तान् ॥८०॥

अर्थ :- भगवंताची कीर्ति ऐकली किंवा वर्णन केली असता भगवान् लवकर प्रकट होतो व भक्ताला आपला स्वरूपानुभव देतो. ॥८०॥

भगवदाविर्भावः

अधिकरणमाला

देवाविर्भवनं भक्त्या न वा न ईशनिराकृतेः ।
अनध्यस्तविवर्तत्वात् आविर्भवति केशवः ॥५८॥
देवानुभावयति किं भक्तान् सकलान् उतेह सकलांश्च ।
समस्तभूतसमेऽस्मिन्न हि नापि दुर्जनः कश्चित् ॥५९॥
सलीलं सर्वत्र समं स्वार्तिहरं किन्तु पातुरेव भवेत् ।
अनुभावयत्ययं खलु भक्तानीशस्तथा निजमुखोक्तेः ॥६०॥

शंका १ :- प्रेमभक्तीने भगवान् प्रकट होतो किंवा नाही?
पूर्वपक्ष :- परमेश्वराचे जैमिन्यादिकांनी निराकरण केले असल्यामुळे परमेश्वर प्रगट होत नाही.
सिद्धांत :- परमात्मा अनध्यस्तविवर्तरूप असल्यामुळे गुणकीर्तनादि प्रेमभक्तीने तो आविर्भाव पावतो.
शंका २ :- भगवान् आपल्या भक्ताला स्वरूपानुभव देतो किंवा नाही?
पूर्वपक्ष :- परमात्मा हा सर्व प्राणिमात्रांचे ठिकाणी सम असल्यामुळे त्याला कोणी प्रेम करणारा भक्त नाही किंवा त्याचा द्वेष करणारा दुर्जन नाही.
सिद्धांत :- ज्याप्रमाणे पाणी सर्वत्र सम असले तरी तें जो पितो त्याचीच तृषा हरण करते; त्याप्रमाणे भगवंतांनीच स्वमुखाने -
समोहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योस्ति न मे प्रियः ।
ये भजन्ति मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥ ९.२९
असे गीतेत म्हटले असल्यामुळे तो आपल्या भक्तांनाच आपला अनुभव आणून देतो.

त्रिसत्यस्य भक्तिरेव गरीयसि भक्तिरेव गरीयसि ॥८१॥

अर्थ :- सर्व मार्गांपेक्षा तिन्ही काली अविनाशी असणाऱ्या भगवंताची भक्तीच श्रेष्ठ आहे.॥८१॥

भक्तेर्वरिष्ठत्वम्

अधिकरणमाला

भक्तिः श्रेष्ठा वान्ये देवदयादायकाः स्युरन्येऽपि ।
तयैव नियता दद्यात्तस्मात् सद्भक्तिरेव गरीयसि ॥६१॥

शंका :- भक्तिमार्ग श्रेष्ठ आहे की अन्य मार्ग श्रेष्ठ आहेत?
पूर्वपक्ष :- दुसरेही मार्ग भगवंताची प्राप्ति करून देऊ शकतील; म्हणून भगवंताची भक्तीच श्रेष्ठ आहे असे नाही.
सिद्धांत :- भक्तीच्या सहाय्यानेच इतर मार्गहि भगवंताची प्राप्ति करून देऊ शकतात; स्वतंत्र रीतीने नाही म्हणून म्हणून भक्तीच सर्व मार्गांपेक्षा श्रेष्ठ आहे.

गुणमाहात्म्यासक्ति, रूपासक्ति, पूजासक्ति, स्मरणासक्ति,
दास्यासक्ति, सख्यासक्ति, कान्तासक्ति, वात्सल्यासक्ति,
आत्मनिवेदनासक्ति, तन्मयासक्ति,
परमविरहासक्तिरूपैकधाप्यैकादशधा भवति ॥८२॥

अर्थ :- प्रेमभक्ति एकरूपाच असली तरी ती -
(१) भगवन्ताच्या गुणमाहात्म्याच्या ठिकाणी प्रेमासक्त होणे.
(२) भगवन्ताच्या रूपाच्या ठिकाणी चित्त आसक्त होणे.
(३) भगवन्ताच्या पुजेच्या ठिकाणी प्रेम जडणे.
(४) भगवन्ताच्या स्मरणाच्या ठिकाणी प्रेम जडणे.
(५) परमेश्वराची सेवा गोड वाटणे.
(६) भगवन्ताची मैत्री करण्यात प्रेम वाटणे.
(७) भगवन्ताची पत्नि होऊन राहण्यातच गोडी वाटणे.
(८) भगवन्ताची आई होऊन राहण्यात गोडी वाटणे.
(९) भगवन्ताला अहं-ममता समर्पण करणे.
(१०) भगवन्ताच्या ध्यानाने तन्मय होणे.
(११) पतिव्रता स्त्रियेप्रमाणे भगवन्ताचा विरह वाटणे.
याप्रमाणे अकरा प्रकारची होते.॥८२॥

भक्तेः प्रकाराः

अधिकरणमाला

(१)प्रकाराः सन्ति वा भक्तेर्न नो नित्यैकरूपतः ।
सन्ति सद्वृत्त्यवच्छेदात् सच्चिदानन्दब्रह्मवत् ॥६२॥

(टीप - (१) सा एकधैव बहुधा भवति सूर्यकिरणप्रसरवदित्यर्थः ॥
अर्थ :- सूर्याच्या किरणांप्रमाणेच भक्ति ही एकरूप असली तरी अनेकरूप होते. गीतेत भगवंतांनी - ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते । एकत्वेन च पृथक्त्वेन बहुधा विश्वतो मुखम् ॥अ९.१५॥ या श्लोकाने असेच सांगितले आहे.)

इत्येवं वदन्ति जनजल्पनिर्भयाः एकमताः कुमार-व्यास-शुक-शण्डिल्य-गर्ग-विष्णु-कौण्डिन्य-शेष-उद्धव-आरुणि-बलि-हनुमत्-बिभीषणादयो भक्त्याचार्याः ॥८३॥

अर्थ :- लोकांच्या निंदेची पर्वा न करणारे असे सनत्कुमार, व्यास, शुक, शण्डिल्य, गर्ग, विष्णु, कौण्डिन्य, शेष, उद्धव, आरुणि, बलि, हनुमान, बिभीषण इत्यादि सर्व भक्त्याचार्य एकमताने वरीलप्रमाणेच म्हणतात. ॥८३॥

भक्तपरंपरा

अधिकरणमाला

भक्तौ परम्परा वा नो न मानविनिवारणात् ।
गुरोः परम्परा सिद्धा ब्रह्मबोधे यथा तथा ॥६३॥

शंका :- भक्तिमार्गाला परंपरा आहे किंवा नाही?
पूर्वपक्ष :- भक्तिमार्गात प्रमाणांचे निवारण केले असल्यामुळे भक्तिमार्गाची परंपरा नाही.
सिद्धांत :- ज्याप्रमाणे ज्ञानमार्गात ब्रह्मबोध करून देणारी गुरुपरंपरा आहे त्याप्रमाणे भक्तिमार्गाची परंपरा आहे.

य इदं नारदप्रोक्तं शिवानुशासनं विश्वसिति श्रद्धत्ते
स प्रेष्ठं लभते स प्रेष्ठं लभते इति ॥८४॥

अर्थ :- जो कोणी, शिवांनी श्रीनारदांना व श्रीनारदांनी सर्व लोकांना सांगितलेल्या या भक्तिशास्त्रावर दृढ विश्वास ठेवून तसे वागतो, तो प्रियतम पदाला प्राप्त होतो- प्रियतम पदाला प्राप्त होतो.

श्रीमज्ज्ञानेश्वराचार्योऽलन्दिसिंहासने स्थितः ।
तस्य श्रीचरणाम्भोजेऽर्पितेयं कुसुमाञ्जलिः ॥६४॥

अर्थ :- आळंदीच्या सिंहासनावर बसलेले माझे आचार्य श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या चरणकमळी ही पुष्पांजली अर्पण केली.

॥ हरिःॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछन्दबद्धे नारदीयभक्ति-न्यायमालाविस्तरः ॥

ooo

श्रीगुलाबरावमहाराजांचा परिचय

(इ. स. १८८१ ते १९१५)

''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड. चवथ्या महिन्यात नेत्रहीनत्व, माधानसारख्या खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे. त्यांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

१ श्रीमहाराजांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला. हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

२. संताची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.

३. भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे. तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून **शंकराचार्यांच्या अद्वैतात 'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.**

४. डार्विन, स्पेन्सर, बेझंट वगैरे पाश्चात्य तत्त्वेत्त्यांच्या विचारसरणी किंवा इलेक्ट्रॉनिक थियरीज सारख्या अत्याधुनिक मीमांसा देखील युक्तिपरिपूत आर्य-सिद्धान्तांपुढे कां टिकत नाहीत, याचे सडेतोड युक्तिवादाने प्रतिपादन केले.

५. न्यायदर्शनातील प्रत्यक्षखंडातून आर्यांच्या पुरातन भौतिक शास्त्रांचे पुनरुज्जीवन कसे करावे, याचेही उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

६. भारतीयांच्या उज्वल इतिहासाची आणि अक्षुण्ण शिक्षणपरंपरेची खिस्ती इंग्रजांनी बुद्धिपूर्वक केलेली विकृती उघडकीस आणली.

७. आर्य हा वंश नाही. आर्य बाहेरून भारतात आले नाहीत. आर्य म्हणजे सुसंस्कृत मनुष्य हाच अर्थ आहे. ३००० वर्षापूर्वी सर्व जगात सनातन आर्य संस्कृतीच पसरलेली होती. हे प्राचीन ऐतिहासिक सत्य अनेक प्रमाणे देऊन नव्याने प्रस्थापित केले.

८. भक्ती, वेदान्त, सांख्य, योग, न्याय, आयुर्वेद, संगीत, साहित्य, नाटक, व्याकरण, कोश, क्रीडा, लिपी वगैरे अनेक विषयांवर 'सूत्र' आणि भाष्य रचनेपासून प्रकरण ग्रंथांपर्यंत विविध प्रकारची ग्रंथनिर्मिती निरनिराळ्या भाषाशैलीत करून त्या त्या शास्त्रात महाराजांनी नवेनवे मौलिक योगदान दिले.

त्याचे सर्व लिखाण प्रखर तर्कवादाच्या चौकटीत आहे. त्यांच्या सर्व लेखनात वेद, पुराणे, रामायण, महाभारत, स्मृती वगैरेंची संतवचनांच्या आधाराने समन्वय केलेली शास्त्रीय मांडणी आहे. आधुनिक काळात सहसा न सांपडणारा हा फार मोठा विशेष महाराजांच्या ठिकाणी स्पष्टपणे जाणवतो.

९. जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा **सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त** सर्वांपुढे मांडला. आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्याचे समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले.

अशा मौलिक विचारांनी भरलेल्या महाराजांच्या वाङ्मयाचा विस्तार बराच मोठा आहे. ग्रंथसंख्या १३३, पत्रे व समीक्षा ११९, अभंग २५००, पदे २५००, गीते १२५०, श्लोकादि कवित्व १०००, ओवीसंख्या २३००० असून अंदाजे ६००० पृष्ठे आहेत. ही सर्व रचना संस्कृत, मराठी, हिन्दी, वज्रभाषा व वऱ्हाडी इ. भाषांतून झाली आहे. साहित्यिक दृष्टीनेही प्रस्तुत वाङ्मयाचा कस ज्ञानेशांच्या कन्येला शोभणाराच आहे.

बालपणी नवव्या महिन्यात नेत्रहीन झालेल्या महाराजांच्या केवळ ३४ वर्षाच्या

अल्पायुष्यात झालेल्या या सर्व ज्ञानशाखांना कवेत घेणारा मूलभूत वैचारिक योगदानाचा विचार केला असता- अल्पवयात अजोड कार्य करणाऱ्या पूज्यपाद श्री आद्यशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर महाराज यांचीच आठवण येते आणि भारतातील महर्षी भगवान् श्रीव्यासांच्या सर्वस्पर्शी ज्ञानपरंपरेचा स्रोत अखंड असल्याची जाणीव होते.

जीवन-आलेख

* नाव : श्री गुलाब गोंदुजी मोहोड, इ. स. १८८१ ते १९१५.
* माता - पिता : श्री गोंदुजी व सौ. अलोकाबाई मोहोड.
* ६ जुलै १८८१, आषाढ शु. १०. अमरावतीजवळ लोणीटाकळी येथे जन्म.
* चवथ्या महिन्यात अंधत्व / अल्पायुषी : वय चौतीस वर्षे.
* वयाची पहिली चार वर्षे माधानला वास्तव्य.
* इ. स. १८८५ : मातृवियोग
* त्यानंतरची सहा वर्षे आजोळी-लोणीटाकळीला वास्तव्य.
* या काळात प्रज्ञाचक्षुत्वाचा प्रत्यय.
* यांनतरचा इ. स. १९०० पर्यंत माधानाच्या घरी वास्तव्य. या काळात दैवी गुणांचा उदय आणि सर्वज्ञतेचा परिचय. लोकांकडून ग्रंथ वाचवून घेण्यासाठी आत्यंतिक परिश्रम.
* इ. स. १८९६ : विवाह. पत्नी : सौ. मनकर्णिका.
* इ. स. १८९७ पासून निबंध व अभंगांची रचना, आनंदमार्ग खंडन. पितृवियोग
* इ. स. १९०० बालसवंगड्यांना अनुग्रह सिरसगाव, चांदूरबाजार, यावली इत्यादी ठिकाणी लोकोद्धारासाठी भ्रमंती. घरच्या विषप्रयोगादि कटकटींना कंटाळून आणि पाटीलकीवर पाणी सोडून गृहत्याग..
* इ. स. १९०१ श्रीज्ञानेश्वरमाउलीचा साक्षात् अनुग्रह.
* इ. स. १९०२ - ग्वाल्हेरचे स्वानंदसाम्राज्यकर्ते श्रीमंत जठार यांना पत्र. त्यात
* मानभावमत समीक्षा, * डार्विन मतसमीक्षा, * स्पेन्सरमत समीक्षा.
* स्त्रीगीते या झोपाळ्यावरील व जात्यावरील लोकगीतांची रचना.
* पंढरपूर यात्रा. * अमरावतीला आगमन.
* हरिभाऊ केवले या शिष्योत्तमाची भेट.
* इ. स. १९०३ - * कात्यायनी व्रताचा आरंभ. देउरवाडा
* इ. स. १९०४ -
* पूर्वजन्माचे संस्मरण - गुजरातेतील झुंझुवाडा येथील सत्पुरुष बेचरानंदस्वामी.

* आर्वीचे सत्पुरुष दामोदर आपाजी महाराज यांची भेट.
* ज्ञानेश्वरीच्या निरूपणास आरंभ-
* ज्ञानेश्वरीतील उपलब्ध प्रतीत नसलेली ओवी सांगितली.
* माधुर्यामृतसागरास भरती, * विविध विषयावर निरूपणे,
* बालसवंगडी व पहिला शिष्य असलेल्या रामचंद्रबापूंना मृत्युसमयी दिलेल्या सूचना.
* आळंदीवारीचा आरंभ.
* स्त्रीव्रतांचा आरंभ. * रुक्मिणी स्वयंवराची रचना.
* इ. स. १९०५ - * महाराजांचा श्रीकृष्णाशी विवाह.
* श्रीकृष्णमूर्ती व ज्ञानेश्वरमाउलीच्या पादुकांची प्राप्ति. * नित्यपूजा.
* प्रियशिष्य आणि उत्तराधिकारी नारायण पंडितांची भेट.
* मुलगा-अनंत यांचा जन्म.
* ल. रा. पांगारकरांची व लोकनायक बापूजी अणे यांची भेट.
* इ. स. १९०७ - * नागपूर येथे ज्ञानेश्वर मुद्रणालयाची स्थापना, व ग्रंथछपाईला आरंभ.

* मायर्सच्या ग्रंथाची समीक्षा.
* वैज्ञानिक जगदीशचंद्र बोसांच्या ग्रंथांची समीक्षा.
* कलकत्ता येथे प्रा. प्रियनाथ मुकर्जीकडे मुक्काम.
* जगन्नाथपुरीयात्रा. * योगप्रभाव निरूपणे, चित्तोपदेश व सद्वैजयंतीची रचना.
* शिवाच्या पार्थिवपूजनाचा आरंभ.
* प्रियलीलामहोत्सवादि ग्रंथांची रचना.
* इ. स. १९०९ - * अंतर्विज्ञानसंहिता या यासूत्रग्रंथाची रचना व त्यातील सात सूत्रावर अलौकिक व्याख्याने.
* वृन्दावनाची यात्रा.
* इ. स. १९१० - * डॉ. मुंजेना पत्र,
* न्याय वैशेषिकातून भौतिक विज्ञानासंबंधी मार्गदर्शन.
* पुण्याच्या साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकरांशी भेट.
* इ. स. १९११ ते १९१३- विविध विषयांवर पत्रे, लेख व अनेक ग्रंथांची निर्मिती.
* इ. स. १९१४ - * श्रीनिवृतिनाथांचा दृष्टांत,
* देवासच्या श्रीमंत तुकोबाराजे पवारांशी पत्रव्यवहार व देवासभेट.
* संगीतकार पं. भातखंडेशी पत्रद्वारे चर्चा व गानसोपानाची रचना.
* धुळ्याचे सत्पुरुष बाबा गर्दे यांचेशी भेट.
* 20 l ›bõº 1915 - **भाद्रपद शु. १२ वामनद्वादशी** रोजी पुणे मुक्कामी, चाकण ऑइलमिलच्या परिसरातील वास्तूत, शेवटच्या क्षणी देखील, स्वतःच्या अनुभवाचा दाखला देऊन, शास्त्रनिष्ठेचा नारायण पंडितांना उपदेश केला आणि सूर्योदयाचे समयीं **ब्रह्मस्थानी प्रस्थान** केले.

कार्याचा आलेख

* नाव : श्री गुलाब गोंदुजी मोहोड, इ. स. १८८१ ते १९१५.
* गोपीभाव : ज्ञानेश्वकन्या आणि कृष्णपत्नी.
* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोच्चतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* भगवद्विग्रहाचे अनध्यस्तविवर्तत्व : वेदान्तातील नवीन परिभाषा.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* धर्म आणि तत्वसमन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.
* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्व मीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.

* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन. त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तौलनिक मीमांसा आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* **इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा** आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादांसंबंधी तौलनिक विवेचन.
* लो. टिळक, विवेकानंद, रामतीर्थं वगैरेंच्या काही मतांची चिकित्सा.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.
* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानांचे मूळ स्त्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे, याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांचे षड्दर्शनानुसार प्रस्तुतीकरण.
* इतिहास कोणी कसा लिहावा, आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा ? याचे मार्गदर्शन.
* आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे या ऐतिहासिक सत्याचे मुद्देसूद प्रतिपादन : लो. टिळकांच्या उत्तरधृवीय मताचा परामर्श.
* तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती या ऐतिहासकि सिद्धान्ताची पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना,भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* ''प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता'' हे आधुनिक संकेत संत-साहित्याला किंवा आर्ष-वाङ्मयाला लागू पडत नाहीत याचे स्व-उदाहरणावरून प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश. * स्त्रियांसाठी खास गीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना. * नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन. * नाटक लेखन. * आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीची प्रक्रिया : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी आणि व्रजभाषेत एकूण १३४ ग्रंथांची रचना.
* पत्रे ११८ *अभंग - २०९९, *पदे - २२५२, *गीत - १२५०, *श्लोक – १०००,
* ओव्या - २३०००, *एकूण पृष्ठे ६०००.

०००